१०२ शतकोत्तर वाटचाल
नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक

# बोरीवलीत २८, २९ नोव्हेंबरला शालेय मल्लखांब स्पर्धा होणार

■ मुंबई

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना आणि बिमानगर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी बिमानगर एज्युकेशन सोसायटी शाळा, एलआयसी कॉलनी, शांती आश्रम बस डेपोसमोर, बोरीवली (प.) येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, लातूर, अमरावती, नागपूर या ८ विभागांतील १९२ खेळाडू, १६ मार्गदर्शक, व्यवस्थापक, ३० पंच व अधिकारी, २५ स्वयंसेवक असा एकूण २६३ जणांचा सहभाग असणार आहे.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी स्पर्धेची पूर्व तयारी जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आणि मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना यांच्यामार्फत मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी आणि उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या स्पर्धेचे आयोजन प्रथमच मुंबई उपनगर जिल्ह्यात होणार आहे. त्यामुळे खेळाडूंचे कौशल्य, कसब पाहण्याची संधी मुंबईतील क्रीडाप्रेमींना मिळणार आहे.

Mumbai Edition
Nov 23, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com